दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ७० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.३ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात कोरोना रुग्ण बरे होण्याचा रिकव्हरी रेट ९४.५४ टक्के

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोनाची दुसरी लाट ओसरू लागली असून दैनंदिन रुग्णसंख्या आजही तुलनेने कमीच राहिली आहे. गेल्या २४ तासांत १५ हजार १६९ नवीन रुग्णांची भर पडली असून त्याचवेळी २९ हजार २७० रुग्ण करोनावर मात करून घरी परतले आहेत. दरम्यान, मृत्यूंचा आकडा आज २८५ पर्यंत खाली आला असून ही संख्या आणखी कमी करण्यासाठी आरोग्य यंत्रणा कसोशीने प्रयत्न करत आहे.

राज्यात करोनाच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्येचा उद्रेक पाहायला मिळाला. एप्रिल महिन्यात या साथीने राज्यात थैमान घातले होते. दैनंदिन रुग्णसंख्येने ६७ हजारांचा टप्पा गाठला होता. त्यानंतर ही लाट हळूहळू ओसरायला लागली आहे. रुग्णसंख्येत सातत्याने चढउतार पाहायला मिळाले असले तरी आता दैनंदिन आकडे १५ हजारांपर्यंत खाली आले आहेत. गेल्या दोन आठवड्यात ही लाट खऱ्या अर्थाने उतरणीला लागली आहे. राज्यात मंगळवारी करोनाचे १४ हजार १२३ रुग्ण आढळले होते. आज त्यात थोडी वाढ झाली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## वाढदिवसाच्या औचित्याने १ लाख कुटुंबांना जीवनावश्यक अन्नधान्य वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**महापूर असो वा कोरोना वैश्विक महामारी किंवा कुठलीही आपत्ती या सर्व परिस्थितीत लोकांना भरघोस मदत करणारे दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वाढदिवसानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी, नागरिकांनी अभिष्टचिंतन करून शुभेच्छांचा वर्षाव केला.**



कोरोना वैश्विक महामारीच्या अनुषंगाने वाढदिवस घरगुती व साध्यापणाने साजरा झाला असला तरी सामाजिक माध्यम, दुरध्वनी माध्यमातून हजारो जणांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त निरोगी दीर्घायुष्याचा शुभेच्छा दिल्या. राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, माजी मंत्री रविंद्र चव्हाण, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार सुधाकर भालेराव, आमदार मंदाताई म्हात्रे, प्रांत अधिकारी दत्तात्रेय नवले, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त सुधाकर देशमुख यांच्यासह लोकप्रतिनिधी, सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, राजकीय, सांस्कृतिक तसेच विविध संस्था, संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील तब्बल ०१ लाख कुटुंबांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूं असलेल्या रेशन किटचे वाटप होत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. सध्या कोरोना महामारीचे संकट असल्याने मागील वर्षीप्रमाणे यंदाही गरजूंना अन्नधान्य जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सुरु आहे. भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे यांच्या सुयोग्य नियोजनातून तालुक्यातील गावागावांमध्ये तसेच शहरांमध्ये गरजूंना अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे. कोरोना महामारीच्या काळात अत्यंत संवेदनशीलपणे दखल घेवून या उपक्रमाचे आयोजन केले आहे. अशा पद्धतीने एका वेळी ०१ लाख गरजू कुटूंबांना धान्य वाटप करून वाढदिवस साजरा करणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे देशातील बहूदा एकमेव व्यक्तिमत्व असणार आहेत.

त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या रुपात आजच्या जगात देखील जीवंत माणसांत देव पहायाला मिळाल्याची भावना तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त नागरिकांकडून गावोगावी आणि शहरात होत आहे.

## संक्षिप्त...

### केंद्राच्या लसीकरण धोरणावर सुप्रीम कोर्टाचे गंभीर सवाल

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

नवी दिल्लीः केंद्र सरकारच्या लसीकरण धोरणावर सुप्रीम कोर्टाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. १८-४४ वर्षांवरील नागरिकांच्या लसीकरण धोरणावर प्राथमिकदृष्ट्या तर्कसंगत नसल्याचं सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या या लीसकरण धोरणाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले आहे. करोनाच्या या संकटात लसीकरण अत्यंत आवश्यक आहे. करोनाच्या संसर्गात १८-४४ वर्षांदरम्यानचे नागरिकही बाधित होत आहे. एवढचं नव्हे त्यांची प्रकृती गंभीर होत असून त्यांना बराच काळ हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल व्हावं लागत आहे. दुर्दैवाने काही रुग्णांचे मृत्युही होत आहेत, असं निरीक्षण सुप्रीम कोर्टाने नमूद केलं.

करोना संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने १८-४४ वर्षांदरम्यानच्या नागरिकांचेही लवकरात लवकर लसीकरण करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. शास्त्रीय आधारावर विविध वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणाला प्राधान्य दिले जाऊ शकते. पण केंद्र सरकारने लसीकरण मोहीमेच्या पहिल्या दोन टप्प्यात मोफत लस दिली. आणि आता १८-४४ वर्षांदरम्यानच्या नागरिकांच्या लसीकरणाचा खर्च आणि जबाबदारी ही राज्ये आणि खासगी हॉस्पिटल्सवर टाकणं म्हणजे मनमानी आणि तर्कसंगत नसल्याचा हा निर्णय आहे, असं स्पष्ट करत सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला फटकारलं. केंद्र सरकारने ४५ वर्षांवरील नागरिकांचे ज्या प्रमाणे मोफत लसीकरण करत आहे तशीच तरुणांच्या लसीकरणाची जबाबदारीही घेतली पाहिजे, अशी मागणी अनेक राज्यांनी केली आहे. १८-४४ वर्षांदरम्यानच्या नागरिकांच्या लसीकरणाची जबाबदारी केंद्र सरकारने राज्यांवर सोपवली आहे. राज्यांना थेट करोनावरील लस उत्पादक कंपन्यांशी संपर्क साधण्यास सांगण्यात आलं आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

संपर्क : ९८२०३५५३४६

## खा. सुनील तटकरे यांच्या मागणीला राज्य शासनाचे पाठबळ



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे आणि रायगड जिल्ह्यातील जिवना, भरडखोल व आगरदांडा बंदराचा 'सागरमाला' प्रकल्पांतर्गत समावेश तसेच विकासासंदर्भात उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनात कामांचा प्रस्ताव प्राधान्याने केंद्राकडे पाठविण्यात येणार आहे. खा. सुनिल तटकरे यांच्या मागणीला राज्य शासनाचे पाठबळ मिळताना दिसत आहे.

दि. १६ सप्टेंबर, २०२० रोजी केंद्र शासनाच्या नौकायन मंत्रालयामार्फत रायगड जिल्ह्यातील जिवना, भरडखोल व आगरदांडा आणि रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे या बंदरांना अत्याधुनिक सुविधांसह निर्मितीसाठी मान्यता देण्याची विनंती खा. सुनिल तटकरे यांनी केंद्रीय नौकायन मंत्री माननीय मनसुख मांडविया यांच्याकडे केली होती. त्याअनुषंगाने 'प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत' महाराष्ट्र राज्यातील विकसित करावयाच्या बंदरांचा ..../२

## उभ्या ट्रकच्या धडकेत दोघांचा मृत्यु

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - म्हसळा मार्गावर गोंडघर गावा नजीक उभ्या असणाऱ्या डंपर ला दुचाकी धडकल्याने दुचाकीवरील दोघांचा जागीच मुत्यु झाला. तर एक जण जखमी झाल्याची घटना मंगळवारी रात्री घडली.



दिघी - म्हसळा राष्ट्रीय महामार्गावर रात्रीच्या सुमारास दिघी पोर्ट कडे ये- जा करणारे अनेक ट्रक, ट्रेलर, वाहतूक करत असतात. तर काही बंद अवस्थेत उभे केले जातात. मंगळवारी गोंडघर गावा नजीकच्या पेट्रोल पंपाजवळ डंपर बंद पडल्याने उभा करण्यात आला होता. रात्री ९ च्या दरम्यान मेंदडी हुन येणाऱ्या बाईकस्वार यांस हा उभा डंपर दिसला नसल्याने दुचाकीची जोरदार धडक बसली. या अपघातात नरेश बबन जाधव व जनार्दन हरिश्चंद्र वाघे राहणार मेंदडी आदिवासी वाडी यांना गंभीर दुखापत होऊन जागीच मृत्यू झाला. तर वारळ आदिवासीवाडी येथील महेश हरेश पवार हा तरुण जखमी झाला आहे.

या अपघात घटनास्थळी दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक संदीप पोमाण यांनी भेट दिली. व डंपर चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रायगड जिल्हा पुरवठा शाखेत पुरवठा अधिकारी हे अलिबाबा

लहानपणी आमची आजी आम्हाला अलिबाबा आणि चाळीस चोर यांच्या गुहेतील गोष्ट सांगत असायची. ती गोष्ट आम्ही कान टवकारुन ऐकत असायचो. तशीच गोष्ट रायगडच्या पुरवठा शाखेत अलिबाबा म्हणून कार्यरत असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी यांची गोष्ट मी आपणांस सांगत आहे.

अलिबाबा आणि चाळीस चोर! अलिबाबाच्या गुहेमध्ये ज्याप्रमाणे घडत होते परंतु जनतेला कळत नव्हते तशाच प्रकारचे जिल्हा पुरवठा शाखेतील जिल्हा पुरवठा अधिकारी हे अलिबाबा आहेत. कारण ते पुरवठा शाखेत चाललेला अलबेल प्रकार जनतेला कळू नये म्हणून वृत्तपत्रांना त्याची चाहूल लागू नये म्हणून पत्रकारांचे दूरध्वनी क्रमांक (भ्रमणध्वनी क्रमांक) काळ्या यादीत टाकत आहेत आणि आपला कारभार सांभाळीत आहेत. दै.रायगड नगरीच्या मुख्य संपादकांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक ९००४७११९९९ या नंबरवर अनेक वेळा जिल्ह्यातील शिवभोजनच्या बिलाबाबत चाललेल्या गैरप्रकाराबाबत उहापोह करण्यासाठी संपर्क केला असता अलिबाबांनी (जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी) त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक काळ्या यादीत टाकल्यामुळे संपर्क होवू शकला नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गरीबांना एक वेळची रोजीरोटी प्राप्त व्हावी या हेतूने सरकार येताच १० रुपयामध्ये शिवभोजन देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला व त्याला महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व इतर मित्र पक्षांनी पाठींबा देवून शिवभोजन केंद्र राज्यभर सुरू केली आणि त्याच काळात योगायोगाने नकळत संपूर्ण देशावर कोरोनाचा आघात झाला. त्यामुळे त्या शिवभोजनाची किंमत खऱ्या अर्थाने गरीबांना कळून चुकली. ती शिवभोजन केंद्र चालविणाऱ्या चालकांची गेले ५-६ महिने जिल्हा पुरवठा शाखेतून वेगवेगळी कारणे देवून शिवभोजन चालकांना थोपटून निजविण्याचे काम जिल्हा पुरवठा अधिकारी व त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या सल्ल्याप्रमाणे शिवभोजन चालकांना माहिती दिली. परंतु यात दडलयं काय ओ? याची माहिती घेण्यासाठी दै.रायगड नगरीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता दै.रायगड नगरीच्या संपादकांचा भ्रमणध्वनी क्रमांक अलिबाबा असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी काळ्या यादीत टाकून दिला. पत्रकारांना योग्य ती माहिती देण्याचे कर्तव्य आणि चौथ्या आधारस्तंभाचा आदर करणे हे प्रत्येक देशातील नागरिकांचे कर्तव्य असताना माहिती दडविण्यासाठी अलिबाबा असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जाणूनबुजून अशा प्रकारची वागणूक केलेली आहे. त्यामुळे चौथ्या आधारस्तंभाचा नकळत गळा घोटण्याचे काम जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केल्यामुळे त्यांच्यावर उचित कारवाई होणे जरुरीचे आहे.

## वीज वितरणचा लाचखोर कनिष्ठ अभियंता अॅन्टी करप्शनच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ट्रान्सफॉर्मर बसविण्याकरिता इस्टीमेट देण्यासाठी लाच स्वीकारणार्या वीज वितरणच्या नागाव विभागाच्या लाचखोर कनिष्ठ अभियंत्याला रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. आज (१ जून) सायंकाळी सापळा रचून ही कारवाई करण्यात आली आहे.

४० वर्षीय तक्रारदार वीज वितरण कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट घेतात. अलिबाग तालुक्यातील नागाव येथील एका कॉटेजला ट्रान्सफॉर्मर बसविण्याकरिता इस्टीमेट देण्यासाठी वीज वितरणच्या नागाव विभागाचा कनिष्ठ अभियंता अतुल मनोहर मोरे (वय ३२) याने तक्रारदाराकडे १५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

याबाबत तक्रारदाराने रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुसार आज सापळा रचण्यात आला होता. सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास तक्रारदाराकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून ७ हजार ५०० रुपये स्वीकारताना कनिष्ठ अभियंता अतुल मोरे याला रंगेहाथ पकडण्यात आले.

रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उपअधीक्षक सुषमा सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार दिपक मोरे, विशाल शिर्के, महेश पाटील यांनी ही कारवाई केली.

## कोरोनाची साखळी तोडण्यासाठी चिरनेरमध्ये ४ ते १० जून पर्यंत कडक लॉकडाऊन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील ग्रामीण परिसरात गावोगावी कोरोना संसर्गजन्य विषाणूचे थैमान अधिक प्रमाणात घोंगाऊ लागले आहे. कोरोना बाधितां बरोबर मृतांचीही संख्या बळावली आहे.त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून, कोरोनाची साखळी तोडण्यासाठी शुक्रवार ५ जून ते १० जून पर्यंत चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत कडक लॉकडाऊन करण्याचा निर्णय चिरनेर ग्रामपंचायतीने घेतला आहे.तशा प्रकारे माईपपद्वारे दवंडीही संपूर्ण ग्रामपंचायतीचे हद्दीत देण्यात आली आहे.

अत्यावश्यक सेवे व्यतिरिक्त सर्वच दुकाने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.किराणा दुकाने सकाळी ११ वाजेपर्यंत तर दुधाची दुकाने सकाळी ९ पर्यंतच चालू ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याच प्रमाणे आत्ता उद्या ३ जून पासूनच कोरोना बाधित असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी १५ दिवस बाहेर पडू नये,बिना मास्क फिरणाऱ्यांना चिरनेर ग्रामपंचायतीने २०० रुपयांचा दंड ठेवला आहे.

तर बिना मास्क दुकान सुरू ठेवणाऱ्या दुकानदारास ५०० रुपये दंड शिवाय ग्रामपंचायतीकडून ..../२

# कोरोनामुक्त गाव पुरस्कार योजना घोषीत : ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील ग्रामीण भागातील कोरोनामुक्तीच्या कामाला प्रोत्साहन मिळावे व गावे लवकरात लवकर कोरोनामुक्त होऊन त्याद्वारे तालुका, जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्य लवकरात लवकर कोरोनामुक्त व्हावे यासाठी राज्यात कोरोनामुक्त गाव स्पर्धा घेण्यात येत असल्याची घोषणा ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज केली.



मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी नुकताच जनतेशी संवाद साधताना कोरोना संसर्गाला गावच्या वेशीवरच रोखलेल्या गावांचा गौरव केला होता. या उपक्रमास आता अधिक चालना देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. कोरोनामुक्त गाव स्पर्धेत प्रत्येक महसूल विभागात चांगली कामगिरी करणाऱ्या पहिल्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख रुपये, २५ लाख रुपये व १५ लाख रुपये याप्रमाणे बक्षीस दिले जाणार. राज्यातील ६ महसुली विभागात प्रत्येकी ३ प्रमाणे राज्यात एकुण १८ बक्षीसे दिली जातील. यासाठी बक्षीसांची एकुण रक्कम ५ कोटी ४० लाख रुपये असेल. याशिवाय कोरोनामुक्त गाव स्पर्धेत चांगली कामगिरी करणाऱ्या पहिल्या ३ ग्रामपंचायतींना लेखाशिर्ष पंचवीस पंधरा (२५१५) व तीस चौपन्न (३०५४) या योजनांमध्ये प्राधान्य देऊन यामधून प्रत्येक महसूल विभागात पहिल्या तीन ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख रुपये, २५ लाख रुपये व १५ लाख रुपये इतक्या निधीची विकासकामे मंजुर केली जाणार आहेत.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने कोरोनामुक्तीसाठी ग्रामपंचायत स्तरावर ५ पथकांची स्थापना ..../२

# धोक्याची घणघणती घंटा

भारताचे सारे वर्तमान आणि भविष्य केवळ आपल्यालाच कळते; तसेच या देशाच्या उत्कर्षासाठी ईश्वरानेच आपल्याला धाडले आहे, असा भ्रम ज्यांना झाला असेल, त्यांनी गेल्या आर्थिक वर्षाच्या जीडीपीची, म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादनाची आकडेवारी व इतर तपशील जरा पुन्हा डोळ्यांखालून घालावेत. भारताची अर्थव्यवस्था तब्बल ७.३ टक्क्यांनी आक्रसली आहे. याचा अर्थ आर्थिक वाढ उणे ७.३ टक्के झाली. आता तिसरी लाट मर्यादित तडाखा देईल, असे गृहित धरून पुढच्या वर्षाचा आर्थिक विकासाचा दर आठ टक्के असेल, असा अंदाज आहे; मात्र त्या विषयी आत्ताच काही बोलणे धाडसाचे ठरेल. करोनाच्या दुसऱ्या तीव्र लाटेने आधीचे अंदाज खोटे ठरविले. यंदाच्या आर्थिक घसरणीचे खापर करोनाच्या माथी मारणे सरकारला शक्य आहे आणि ते काही प्रमाणात बरोबरही आहे; मात्र करोना बाजूला ठेवला, तरी त्या आधीची सलग चार वर्षे आपला जीडीपी सातत्याने घसरत गेला आहे. तेव्हा तर करोना नव्हता. मग आपण २०१६-१७ मधील ८.२६ टक्के जीडीपी वाढीपासून २०१९-२० मधील ४.२ टक्के जीडीपी वाढीपर्यंत कसे काय घसरलो, याचे उत्तर मोदी सरकारने द्यायला हवे. आधीच्या आर्थिक वर्षातील शेवटची तिमाही करोनाग्रस्त होती. त्या आधीचे काय? हा प्रश्न यासाठी महत्त्वाचा आहे; कारण गेल्या चार-पाच वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेने उत्तम कामगिरी केली असती, तर करोनाचा हा तडाखा बराच सुसह्य झाला असता. करोना येण्याआधी सरकारने अर्थव्यवस्था नीट न हाताळल्याचे परिणाम आज अधिक तीव्र स्वरूपात भोगायला लागत आहेत. हे असे का झाले, याची कारणे समजावून घ्यावी लागतील. मोदी सरकार सत्तेवर आले, तेव्हा एक डॉलर ५९ रुपयांना होता. तो आज ७३ रुपयांना झाला आहे. मोदी आल्यावर एका डॉलरला एक रुपया असे विनिमय मूल्य होईल, असे बरळणारे परिवारात असले तरी अर्थ खात्यात नाहीत, हे खरे आहे; मात्र या घसरत्या मूल्याने जगाच्या बाजारातली रुपयाची पत घसरली आहे. दुसरे म्हणजे, खनिज तेलाच्या जागतिक मंदीने भारतातील चलनवाढ, म्हणजेच महागाई बराच काळ रोखून धरली. २०१९च्या शेवटापासून तेही सुख संपले. चलनवाढ होतेच आहे. सरकार काहीही सांगत असले, तरी अर्थसंकल्पातील वित्तीय तूट प्रत्यक्ष दिसते त्यापेक्षा अधिक आहे. याच काळात आपल्या दरडोई सरासरी उत्पन्नाला बांगला देशानेही मात दिली. आर्थिक बेशिस्तीला आणि गैरव्यवहारांना आळा घातल्याचे दावे सरकार कितीही करीत असले, तरी अर्थव्यवस्थेचे प्राथमिक-मूलभूत घटक मजबूत करण्यात सरकारला यश आलेले नाही. तेच अपयश आज अंगावर उलटते आहे. आता पुढे काय, हा खरा प्रश्न आहे. एक तर, पंतप्रधानांनी तातडीने अर्थकारणाची सूत्रे एखाद्या उत्तम अर्थशास्त्रज्ञाच्या हाती सोपवायला हवीत. जे परराष्ट्र खात्यात जयशंकर यांच्या रूपाने होऊ शकते, ते अर्थ खात्यात का होऊ शकत नाही? करोना हटू लागल्यावर केंद्र सरकारला अभूतपूर्व सरकारी गुंतवणूक करून, देशभरात हजारो सार्वजनिक कामे काढावी आणि करावी लागतील. राजकारण मागे ठेवून हे काम उत्तम प्रशासक नेत्यांच्या हातात जायला हवे. जगभरातले अर्थशास्त्रज्ञ भारताला 'नोटा छापण्याचा' सल्ला तर देत आहेतच. तो मानून अर्थकारणात बक्कळ पैसा ओतावा लागेलच; पण त्यातून टिकाऊ, लोकोपयोगी कामे उभी करावी लागतील. जागतिक वित्तसंस्थांची मदत घेऊन नवी आरोग्य व्यवस्था उभारण्यासारखे महत्त्वाकांक्षी कामही त्यात असू शकते. या साऱ्या मोठ्या कामांचा भर १४ टक्क्यांच्या वर गेलेली बेरोजगारी वेगाने कमी करण्यावर असायला हवा. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची (नरेगा) चौकट त्यासाठी अधिक व्यापक करावी लागेल. शेती आणि कृषिपूरक उद्योगांची रोजगारक्षमता नेहमीच जास्त असते. सुदैवाने, गेल्या वर्षी कृषी क्षेत्राने हात दिला. सरकारने आता दूध, कुक्कुट, मत्स्य, शीतगृहे, बाजार विकास, जलव्यवस्थापन अशा ग्रामीण अर्थकारण सावरू शकणाऱ्या या व इतर विषयांना युद्ध पातळीवर भिडायला हवे. त्यासाठी आंतरमंत्रालयीन व्यवस्था करून निर्णयप्रक्रिया वेगवान केली पाहिजे. शेतकऱ्यांचीच नव्हे, तर शहरी भागांतील छोटी व मध्यम कर्जे नव्याने माफ करायला हवीत. रोजगार गेल्याने आज काही कोटी गृहकर्जे थकली आहेत. त्यांच्यावर भविष्यवेधी मार्ग काढायला हवा. प्रत्येक नागरिकाचे बँक खाते, त्यात थेट जमा होणारे पैसे, स्वस्तातला सिलिंडर ही रेकॉर्ड घासून गुळगुळीत झाली आहे. करोनोत्तर काळात देश सावरण्यासाठी अधिक कल्पकता, निखळ अर्थशास्त्रीय दृष्टी आणि गाव ते दिल्लीपर्यंत अतोनात परिश्रम हवे आहेत. जीडीपीचे ताजे आकडे ही धोक्याची घणघणती घंटा आहे. ज्यांना स्वत:चाच आवाज ऐकण्याची सवय झाली आहे, त्यांनी ती ऐकायला हवी.

# अभियंत्यांचे दुर्लक्षामुळे एमएमआरडीएच्या कामांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान शहरात मागील दोन वर्षापासून एमएमआरडीएच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर विकास कामे युद्धपातळीवर सुरू आहेत परंतु ही होणारी विकास कामे सुध्दा नगरपरिषदेच्या अभियंत्यांचे होत असलेल्या दुर्लक्षामुळे युद्धपातळीवरच डबघाईला आलेली स्पष्टपणे दिसून येत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये सदर कामांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



कस्तुरबा रोड येथे सुरू असलेल्या रस्त्याचे काम पहिल्याच पावसात कोलमडून गेले आहे.तर छत्रपती शिवाजी महाराज नगर येथील नव्याने सुरू असलेल्या रस्त्याचे काम सुयोग्य पद्धतीने न केल्यामुळे सर्व दगडमाती नागरी वस्ती भागात विखुरली गेली त्यामुळे नागरिकांना रात्री अपरात्री चालणे अत्यंत जिकिरीचे आणि त्रासदायक बनले आहे.

कस्तुरबा रोड भागात सर्व मोठं मोठी हॉटेल इंडस्ट्री असून रस्ते सुस्थितीत असल्यास पर्यटकांना चालणे सुलभ होणार आहे परंतु एमएमआरडीए मार्फत होत असणाऱ्या या सर्वच विकास कामांवर नगरपरिषदेच्या अभियंत्यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रत्येक कामात चालढकल केलेली दिसून येत आहे. पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी क्ले पेव्हर रस्त्यावर कुठल्याही प्रकारचा उतार केलेला नसून पाणी रस्त्याच्या मधोमध साठत आहे. नुकताच पाऊस सुरू झाला असून रस्त्याच्या बांधकामात वापरण्यात येणारे सामान अल्प प्रमाणात असल्याने कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत त्यामुळेच ही होत असलेली कामे लवकरच डबघाईला आलेली दिसत आहेत.कधी नव्हे एवढा भरीव निधी एमएमआरडीए कडे आलेला आहे आणि जर अशीच तकलादू कामे होत राहिली तरआगामी काळात भावी पिढीला खूपच कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. निदान आतातरी लोकप्रतिनिधीनी सदर कामांवर आपले लक्ष केंद्रित करून होणाऱ्या विकास कामे पारदर्शी असण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली आहेत त्या कामाची बिले अदा करू नयेत असे जाणकार मंडळींमधून बोलले जात आहे.

खूपच निकृष्ठ कामे केली जात आहेत हे पाहून दुःख होत आहे. तीस गोणी ग्रीट मध्ये अवघी एक गोणी सिमेंटचा वापर केला जात आहे. तर कुठेही एकसंध कामे दिसून येत नाहीत त्यामुळे लवकरच ही कामे पुन्हा करण्यासाठी नगरपरिषदेच्या तिजोरीवर पुढील काळात बोजा पडणार आहे.

**शफीक दाऊद शेख, अध्यक्ष**
**शेकापक्ष माथेरान**

# अनिल गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । माथेरान**

येथील आर.पी. आय. पक्षाचे अध्यक्ष श्री. अनिलभाई गायकवाड हे नेहमी सर्व क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवून सत्यात उतरविण्यात माहिर आहेत. येथील युवक वर्गाला सतत जागरूक ठेवून समाजासाठी काहीतरी नवीन करून ते सर्वासमोर आदर्श ठेवत असतात. १ जुन हा त्यांचा जन्मदिन म्हणजेच वाढदिवस माथेरान येथील पंचशील विभागात, पूर्वी केरकचरा टाकण्याच्या जागेवर माथेरान नगरपरिषद स्वच्छता, सुशोभिकरण करत आहे. पण या जागेच्या बाजूला कोणतेही वृक्ष नसल्याने तिथे दिवसभर ऊन राहणार आहे, हे लक्षात घेऊन या जागेच्या तिन्ही बाजुला अशोक, करंज अशा मोठया वृक्षांचे वृक्षारोपण स्व:खर्चाने केले आहे स्वत:च्या वाढदिवसानिमित्ताने एक आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला आहे. तसेच वृक्ष संवर्धन करण्याचा संकल्प देखील केला आहे.

पर्यावरण, वृक्षरोपण व वृक्षसंगोपनासाठी ' मनात झाड लावल्याशिवाय जमिनीत झाडं उगवणार नाही' या विचारांनी, तसेच वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ' या संत तुकोबाराय यांच्या शिकवणीतले पर्यावरणाचे संवर्धन अधोरेखीत करत आणि ' जन्मदिनी वृक्ष लावू अंगणी' ही संकल्पना, नवविचार व संदेशच जणु त्यांनी तरुण पिढीला प्रत्यक्ष कार्यातुन दिला आहे. ऐरव्ही वाढदिवस म्हंटला की, पिकनिक, पार्टी, मौजमस्ती, केक कापुन तोंडाला फासणे असे चुकीचे पायंडे काही ठिकाणी अनुभवायला मिळतात. त्यापेक्षा, निदान ज्यांचा वाढदिवस जुन ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या काळात आहे, त्यांनी निदान एक किंवा दोन तरी झाडे ' जन्मदिनी वृक्ष लावू अंगणी' या संकल्पनेतून लावल्यास दीडशे ते दोनशे झाडे या काळात निश्चितच गावात लावली जातील. वाढदिवसाच्या दिवशी आपल्या हातून वृक्षारोपण केलं जाण्याचा, निसर्गातली हिरवाई टिकवण्यात हातभार लावण्याचा आनंद हा अनोखा असतो. तसेच आगामी पिढीला वृक्षलागवडीतून पर्यावरणाची भेट देण्याचा व आत्मसुख व आत्मसमाधानाची अनुभूती देणारी ही संकल्पना होय.

या कार्यक्रमाला माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांची ही ऊपस्थिती लाभली. आणि त्यांनी अनिलभाई याना कडुलिंबाचे वृक्ष वाढदिवस भेट म्हणून दिली. तत्काळ अनिलभाई यांनी त्याचे बूद्धविहारात त्यांच्या पत्नी स्मिता अनिल गायकवाड आणि पुत्र श्रेयश अनिल गायकवाड यांच्यासह वृक्षारोपण केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष गौतम भीमराव गायकवाड, विद्यमान नगरसेवक श्कीलभाई पटेल, नरेशभाई काळे, विद्यमान नगरसेविका नजमा शारवान, माजी नगरसेवक संतोष शिंदे, माथेरान वनसंवर्धन समितीचे सदस्य नितीन वि. सावंत, मनीषा शिंदे, असिफ मुजावर, रुपेश गायकवाड, सुभाष हातोले, श्रीकांत कदम, राजू जांभळे, नरेश पवार, प्रवीण गायकवाड, आरिफ पन्हाळकर इत्यादि मान्यवर आवर्जुन उपस्थित होते. माथेरान येथील श्री. अनिलभाई यांच्या या पर्यावरणस्नेही, स्तुत्य उपक्रमाचे मित्रमंडळात कौतुक होत आहे.

# श्रीवर्धन वासियांच्या मनात अजून धडकी भरवतोय मागील वर्षीच्या तीन जूनच्या निसर्ग चक्रीवादळाचा काळा दिवस

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील वर्षीचा ३ जून हा दिवस श्रीवर्धन वासियांच्या मनात कायमचा काळा दिवस म्हणून नक्कीच लक्षात राहील. यावर्षी तौक्ते चक्रीवादळ ज्याप्रमाणे अरबी समुद्राच्या दक्षिण भागात अंदमान-निकोबार जवळ तयार झाले होते, त्याप्रमाणे मागील वर्षी अरबी समुद्राच्या दक्षिण भागामध्ये निसर्ग नावाचे भयंकर चक्रीवादळ निर्माण झाले होते. हे चक्रीवादळ देखील अरबी समुद्रातून गुजरातच्या दिशेने सरकेल असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला होता. परंतु वादळाने आपला मार्ग अचानकपणे बदलल्यामुळे वादळाचा किनारपट्टीला धडकण्याचा मार्ग हरिहरेश्वर व श्रीवर्धन समुद्र किनारी झाला होता. वादळ आपली दिशा बदलत आहे असे हवामान खात्याच्या लक्षात आल्यानंतर हवामान खात्याने तशा सूचना राज्य सरकारला दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने राज्य शासनाने श्रीवर्धनमध्ये एन.डी. आर.एफ.च्या दोन टीम तैनात केल्या होत्या. ३ जून रोजी पहाटेपासूनच हलक्या स्वरूपाचे वारे सुरू झाले होते. मात्र सकाळी ११ वाजता पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणारे जोरदार वारे वाहू लागले. परंतु त्यांची तीव्रता काहीशी कमी होती. त्यावेळी फारसे नुकसान झाले नव्हते. त्यानंतर बारा ते एक वाजेपर्यंत वादळ थांबल्या सारखे वाटले, थोडेसे ऊन देखील पडले. परंतु दुपारी एक ते तीन वाजून पंधरा मिनिटे पर्यंत वादळ किनारपट्टीला धडकण्याची प्रक्रिया हरिहरेश्वर, श्रीवर्धन समुद्रकिनारी झाली. या सव्वा दोन तासांमध्ये हरिहरेश्वर व संपूर्ण श्रीवर्धन तालुक्याला वादळाने होत्याचे नव्हते करून टाकले. निसर्ग चक्रीवादळाने श्रीवर्धनचे निसर्ग सौंदर्य हरपून टाकले होते. तालुक्यातील ९० टक्के घरांवरील छपरे उडून गेली होती, तर ७० ते ८० टक्के नारळ-सुपारीच्या वाड्या अक्षरशः जमीनदोस्त झाल्या होत्या. नारळ सुपारीच्या वाड्यामध्ये असलेली आंबा, फणस, कोकम अशा प्रकारची मोठी झाडे देखील या वादळामध्ये पूर्ण नाहीशी झाली आहेत. या वर्षीच्या मे महिन्याच्या हंगामात नागरिकांनी अद्याप कोकम किंवा फणस पाहिलेला नाही. विजेचे उच्चदाब वाहिनीचे पोल, त्याचप्रमाणे कमी दाब वाहिनीचे पोल जवळ जवळ सर्वच जमीनदोस्त झाले होते. श्रीवर्धन शहरातील वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी महावितरणला तब्बल २९ दिवस लागले होते. तर हरिहरेश्वर परिसरात विद्युत पुरवठा सुरू होण्यासाठी ५५ दिवसांचा कालावधी लागला होता. त्यामानाने या वर्षी १६ मे रोजी आलेल्या तौक्ते चक्रीवादळाची तीव्रता खूप कमी होती. कारण हे वादळ श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यापासून अंदाजे दीडशे ते दोनशे किलोमीटर आत मधून गुजरातच्या दिशेने सरकत होते. या वेळेला महावितरण कंपनीचे देखील नुकसान अत्यंत कमी झाले. तसेच नागरिकांच्या घरांचे किंवा झाडांचे नुकसान अत्यल्प झाले. निसर्ग चक्रीवादळाच्या वेळी श्रीवर्धन शहरात रस्त्यावर पडलेली झाडे व पालापाचोळा साफसफाई करण्यासाठी नगरपरिषदेला दहा ते बारा दिवसांचा कालावधी लागला होता. वादळानंतर सर्वपक्षीय नेत्यांचे श्रीवर्धनमध्ये दौरे झाले. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा दौरा झाल्यानंतर त्यांनी राज्य शासनाला सूचना देऊन श्रीवर्धन तालुक्यासाठी भरघोस मदत देखील जाहीर केली होती.

तीन जून रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळाच्या खुणा अद्यापही श्रीवर्धनच्या नागरिकांच्या समोर नियमितपणे दिसत आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील नारळ-सुपारी बागायतदार त्याचप्रमाणे आंबा काजू बागायतदार या वादळा मुळे दहा वर्ष मागे गेला आहे. नारळाची काही झाडे जरी अद्याप उभी दिसत असली तरी ती चक्रीवादळामुळे जायबंदी झालेली आहेत. ती केव्हाही पडतील व मरून जातील अशा अवस्थेत आहेत. तीन जून रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळाचा थरार अद्यापही श्रीवर्धनच्या प्रत्येक नागरिकाच्या मनात निश्चितच राहिलेला असेल.

# गिरीजा वृध्दाश्रमामध्ये विशेष कोविड लसीकरण सत्राचे आयोजन; ३० वृध्दांचे लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने गिरीजा वेलफेअर असोशिएशन वृध्दाश्रमामध्ये विशेष कोविड लसीकरण सत्र आयोजित करण्यात आले. या लसीकरण सत्राला आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त सुधाकर देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ.पंडित उपस्थित होते.

खारघर येथील गिरीजा वेलफेअरअसोशिएशन वृध्दाश्रम हे निराधार लोकांसाठी चालवले जाते. याठिकाणी ६० ते ९० वर्षापर्यंतचे वृद्ध राहतात. यातील अनेक वृध्दांना लसीकरण केंद्रावर जाऊन लस घेणे शक्य नसल्याने आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या निर्देशानुसार कोविड लसीकरणाच्या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी येथील ३० वृध्दांचे लसीकरण करण्यात आले. यासाठी डॉ. अश्विनी देगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या टिमने परिश्रम घेतले.




पृष्ठ क्र.१ वरुन...

## खा. सुनील तटकरे यांच्या मागणीला राज्य शासनाचे पाठबळ

प्राधान्यक्रम निश्चित करून बंदरे निर्मितीसाठी राज्याचा हिस्सा अंतर्भूत करण्याच्या हमीसह बंदर विकासाच्या व जलवाहतूक मार्गाच्या आराखड्यासह प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याबाबत तसेच कौशल्य विकास, आर्थिक उन्नतीसाठीचे कार्यक्रम व मत्स्यसंवर्धनाद्वारे किनारपट्टीवरील समुहाच्या विकासासाठीचे प्रस्ताव सादर करण्याचे सूचित केले होते.

त्याअनुषंगाने माननीय उपमुख्यमंत्री महोदय ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली मा.खा.सुनिल तटकरे यांच्या विशेष मागणीने सदर बैठकीचे आज (दि.२ जून ) मंत्रालयात आयोजन करण्यात आले होते. याबैठकीस रत्नागिरीचे पालकमंत्री ना.अनिल परब (व्हिसीद्वारे), रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, अपर मुख्य सचिव (बंदरे), आयुक्त मत्सव्यवसाय, रायगड व रत्नागिरी जिल्हाधिकारी (व्हिसीद्वारे) तसेच, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील जीवना व भरडखोल (ता.श्रीवर्धन) व रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे (ता.दापोली) बंदराच्या व जलवाहतूक मार्गांच्या अत्याधुनिक विकासाचा प्रकल्प आराखडा, त्यासाठी राज्य शासनाच्या सहभागाची हमी आणि कौशल्य विकास, आर्थिक उन्नतीसाठीचे कार्यक्रम व मत्स्यसंवर्धनाद्वारे किनारपट्टीवरील समुहांच्या विकासासाठी राज्याचा प्रस्ताव प्राधान्याने केंद्र शासनाकडे तातडीने सादर करण्याच्या सुचना मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी दिल्या आहेत. तसेच, आगरदांडा (ता. मुरूड) बंदराला नाबार्डच्या योजनेतून मंजूरी देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

## कोरोनाची साखळी तोडण्यासाठी चिरनेरमध्ये ४ ते १० जून पर्यंत कडक लॉकडाऊन

देण्यात आलेला व्यवसायिक परवाना रद्द करण्यात येईल. तसेच लग्न समारंभात फक्त २५ माणसांना परवानगी देण्यात आली असल्याची माहिती चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष चिर्लेकर यांनी दिली आहे.

## कोरोनामुक्त गाव पुरस्कार योजना घोषीत : ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ

करुन त्यांच्यामार्फत विविध उपक्रम राबवावयाचे आहेत. यामध्ये ग्रामपंचायत प्रभागनिहाय कुटुंब सर्वेक्षण पथक, विलगीकरण कक्ष स्थापन करुन त्यासाठी कार्यवाही करणारे पथक, करोना तपासणीसाठी व रुग्णांना रुग्णालयात भरती करण्यासाठी घेऊन जाणाऱ्या वाहन चालकाचे पथक, कोविड हेल्पलाईन पथक आणि लसीकरण पथक या पथकांचा समावेश असेल, अशी माहिती मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिली. स्पर्धेत सहभागी गावांचे विविध २२ निकषांवर गुणांकन करण्यात येणार आहे.

# एका तलाठ्यावर सहा कार्यालयांची जबाबदारी ; नागरिकांची होतेय गैरसोय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका कार्यालयाची जबाबदारी सांभाळताना तलाठ्याच्या नाकीनऊ येत असताना पनवेल मध्ये एका तलाठ्यावर तब्बल सहा कार्यालयांचा अतिरिक्त कारभार देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.३१ ऑगस्ट २०२० रोजी पनवेल तलाठी क्रमांक १ या सजेची जबाबदारी संजय पाटील यांच्यावर सोपविण्यात आली होती. या कार्यालयात असलेल्या तलाठी क्रमांक २,३,४ या कार्यालयांची जबाबदारी देखील संजय पाटीलच सांभाळत असताना त्यांच्यावर कराडे खुर्द व नव्याने पाली देवद अशा तलाठी कार्यालयांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पनवेल शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या लाईन आळी मध्ये हे तलाठी कार्यालय आहे.पनवेल शहरासह खांदा कॉलनी,खांदा गाव, नवीन पनवेल आदी शहरांचा वाढत ताण लक्षात घेता अडीच वर्षांपूर्वी पूर्वाश्रमीच्या २ सज्यांची व्याप्ती वाढवून आणखी २ सजा अस्तित्वात आणल्या आहेत.पनवेल शहरासह आजूबाजूच्या उपनगरांची जबाबदारी पनवेल येथील एकूण ४ कार्यालयांची जबाबदारी सांभाळत असलेल्या तलाठी संजय पाटील यांच्यावर असताना पनवेल शहरापासुन सुमारे २० किमी पर्यंत असलेल्या कराडे खुर्द या साजेचे कारभार देखील संजय पाटील पाहत आहेत. याठिकाणच्या ग्रामस्थांना तलाठी कार्यालयाशी संबंधित कामकाज लागल्यास सुमारे २० किमीचे अंतर पार करत पनवेल शहर गाठावे लागत आहे.तलाठी कार्यालयात विविध शासकीय कामांकरिता नागरिकांना खेटे मारावे लागत असतात.विशेषतः शहरी भागाची जबाबदारी असलेल्या तलाठी कार्यालयाला स्वतंत्र तलाठयाची गरज असते. एकाच तलाठ्यावर पाच ते सहा कार्यालयाची जबाबदारी असल्यास एक तलाठी नेमका किती कार्यालयांना आपला वेळ देऊ शकतो हा देखील महत्वाची विषय आहे.

पनवेल शहरापासुन २० किमी अंतरावर असलेल्या कराडे खुर्दला स्वतंत्र तलाठ्याची गरज आहे.तलाठी कार्यालयाशी संबंधित काम लागल्यास येथील ग्रामस्थांना थेट पनवेल गाठावे लागत आहे.कोविड काळात अत्यावश्यक वेळेला नागरिकांना तलाठी कार्यालयात खेटे मारावे लागत असल्याने याठिकाणी पूर्णवेळ तलाठ्याची नेमणूक करण्याची गरज आहे.

पनवेल मध्ये ऐकून ५९ तलाठी सजा असताना केवळ २५ तलाठी तालुक्यात उपलब्ध आहेत. अशा वेळी कोविड सारख्या अत्यावश्यक परिस्थितीत महसूल व्यतिरिक्त कामे देखील या तलाठ्यांना करावी लागतात.तहसीलदार विजय तळेकर याकरिता या सर्वांचा ताळमेळ घालण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करताना दिसुन येत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मारूती सुझुकी वॅगेनार गाडी घेऊन चालक पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वतःच्या ताब्यात असलेली मूळ मालकाची मारूती सुझुकी वॅगेनार गाडी घेऊन चालक पसार झाल्याची घटना तक्का येथे घडली आहे.

हनिफ चौधरी यांची तीन लाखांची मारूती सुझुकी वॅगेनार गाडी ही चालक सत्यम वाघमारे यांच्या ताब्यात देण्यात आली होती. सदर गाडी नेऊन ती परत न करता परस्पर स्वतःच्या फायद्यासाठी अन्यायाने विश्वासघात करून अपहार करून तिची विक्री केल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अल्पवयिन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घराबाहेर खेळत असणाऱ्या १५ वर्षीय मुलगी कुठेतरी निघून गेली व ती परत न आल्याने कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी तिचे अपहरण केल्याची तक्रार तीच्या कुटूंबियांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात दिली आहे.

करंजाडे गाव येथील हनुमान मंदिराजवळील चाळीत सदर मुलगी राहते. रंग गोरा, उंची अंदाजे साडे ४ फूट, केसाची वाढलेली एक वेणी, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ असून अंगात निळ्या रंगाची जीन्स पँट व पिवळ्या रंगाचा कुर्ता, पायात काळे रंगाचे बूट, कानात साधी कुडी, नाकात साधी चमकी आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-०२२२७४५२३३३ यांच्याशी संपर्क साधावा.

## नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, वशेणी साठी मौजे वशेणी येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उरण तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, वशेणी या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे वशेणी, ता. उरण येथील स.नं. २/३३ क्षेत्र ०.०८.०० हे. आर. पैकी क्षेत्र ०.०५.०० हे. आर. ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही शासकीय जमीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, वशेणी करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

# कोळखे येथे सरपंच मिनल रोहन म्हात्रे यांच्या पाठपुराव्याने लसीकरण केंद्र सुरु

### आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आजिवली मार्फत रायगड जिल्हा परिषद शाळा कोळखे मधे आज कोरोना प्रतिबंधक लसीकरण केंद्राचे उद्घाटन आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या सरपंच मिनल रोहन म्हात्रे यांच्या पाठपुराव्यापुळे हे शक्य झाले असून या नजिकच्या लसीकरण केंद्रामुळे विभागातील नागरिकांना मात्र चांगलाच दिलासा मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे. यावेळी नगरसेवक व शेकापचे पनवेल महानगर चिटणीस गणेश कडू, पंचायत समितीचे उपसभापती भरत म्हात्रे, सरपंच मिनल म्हात्रे, सदस्य रोहन म्हात्रे, सदस्य दिगंबर पाटील, सदस्य गणेश जाधव, सदस्या अपेक्षा जाधव, काँग्रेसचे पळस्पे पंचायत समिती गण अध्यक्ष भालचंद्र पाटील, माजी उपसरपंच दिनकर मुंढे, सुरेश मुंढे, पुरुषोत्तम पाटील, डॉ. संदेश गोवारी आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



एकीकडे जगभरात कोरोना या भयंकर आजाराने थैमान घातले असताना दुसरीकडे कोरोना प्रतिबंधक लस घेतल्याने कोरोना पासून नागरिकांचा बऱ्याच अंशी बचाव होत असल्याचे आरोग्य यंत्रणेकडून सांगितले जात आहे. त्यामुळे लसीकरणाबाबत नागरिकांमध्ये गैरसमज दूर होऊन मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे त्यामुळेच आता सर्वत्र लसीकरणाला वेग आलेल्या असताना आजिवली प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या सर्वच गावांमध्ये सुद्धा लसीकरणाला आता चांगलाच वेग येऊ लागला आहे. जसजशा प्रमाणात लस उपलब्ध होईल तसा लसीकरणाचा अजून वेग वाढेल त्यामुळेच कोरोना महामारीला निश्चितच आळा बसेल व आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी होईल, असे आशादायी चित्र निर्माण होण्यास सुरुवात झालेली आहे.

यावेळी बोलताना आमदार बाळाराम पाटील म्हणाले की, लसीकरण वेगाने होणे गरजेचे असतानाच कोळखे पंचायतीने लसीकरण केंद्र सुरु करून ग्रामस्थांना दिलासा दिला आहे. जिल्ह्यात कोरोना रुग्ण वाढीचा दर कमी करण्यासाठी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही अफवेला बळी न पडता ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने लसीकरण करून घ्यावे. ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांकडे सातत्याने पाठपुरावा करून हे लसीकरण केंद्र सुरु केले आहे. कोव्हीड चे सर्व नियम पाळून याठिकाणी लसीकरण व्हावे. कोव्हीड काळात ग्रामस्थांना कोणतीही अडचण येत असल्यास रोहन म्हात्रे व सहकारी सदैव तत्पर राहतील त्यामुळे नागरिकांनी फक्त नियमांचे पालन करावे आणि ग्रामपंचायतीला सहकार्य करावे असे आवाहन यावेळी आमदार पाटील यांनी शेवटी केले.

कोळखे ग्रामस्थांच्या सोयीसाठी कोळखे ग्रामपंचायतीचे सरपंच मीनल म्हात्रे व सदस्य हे या कोविड कालावधीत ग्रामस्थांना कोरोना लस घेणे सोयीचे व्हावे याकरिता कोळखे येथे लसीकरण केंद्र मिळावे यासाठी प्रयत्नशील होते. सदर केंद्रावर सध्याच्या शासनाच्या नियमानुसार ४५ वर्षावरील नागरींकांचे लसीकरण सुरू झाले आहे. पुढील लसीकरणाचे वेळापत्रक लसीच्या उपलब्धतेनुसार जाहीर करण्यात येईल, असे सरपंच मिनल रोहन म्हात्रे यांनी म्हटले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना खाजगी दवाखान्यात महागडे उपचार घेताना नागरिकांच्या खिशाला कात्री लागते. त्यामुळे कोळखे येथे याआधीच उपकेंद्र सुरु करणे आवश्यक होते . पनवेल तालुक्यात वाढते कोरोना रुग्ण लक्षात घेता लसीकरण केंद्र वाढवणे गरजेचे होते. जिल्ह्यात तसेच पनवेल तालुक्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असताना सगळीकडे भितीचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान कोळखे पंचायतीच्या सरपंच मीनल रोहन म्हात्रे यांच्या प्रयत्नामुळे कोळखे येथे कोरोना प्रतिबंधक लसीकरणाला सुरुवात झाली असुन पहिल्याच दिवशी ५० जणांना कोरोना लस देण्यात आली असुन सकाळी ९ ते ५ या वेळेत लस उपलब्ध असणार आहे. तसेच कोरोनाची लस घेतलेल्यांनी नियमीत तोंडाला मास्क, नियमित सॅनिटायझरने हात धुणे,सोशल डिस्टसिंगचे पालन करणे,तसचे लस घेतल्यानंतर काही त्रास जाणवल्यास जवळील प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन डॉक्टर संदेश गोवारी यांनी केले आहे.

## वेळीच पाऊस न पडल्यास पनवेल परिसराला होईल अपुरा पाणी पुरवठा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मालकीच्या देहरंग (आप्पासाहेब वेदक) धरणाच्या पाण्याने तळ गाठले असून चार किंवा पाच दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा धरणात शिल्लक आहे.त्यामुळे पालिकेला पाण्यासाठी एमजेपीसह इतर आस्थापनांवर अवलंबून रहावे लागणार आहे.

शहरवासीयांना पाणीपुरवठा करण्यासाठी रोज २१० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे; पण प्रत्यक्षात ५२ एमएलडी पाणीच उपलब्ध होत असून, टँकरसह बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. पनवेल शहरात दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीन बिकट होत चालली आहे. पावसाला लांबणीवर गेल्यास या समस्येत भर पडण्याची शक्यता आहे.

ग्रामीण भागात परिस्थिती आणखीनच बिकट आहे. खारघर, कळंबोली, तळोजा, नवीन पनवेल आदी ठिकाणी सिडको मार्फत पाणीपुरवठा केला जातो, तर तळोजा एमआयडीसीमध्ये एमआयडीसी मार्फत पाणीपुरवठा केला जातो.

पनवेल शहरात पालिकेच्या मालकीच्या देहरंग धरणातून, एमजेपी, एमआयडीसी आदी ठिकाणांहून पाणीपुरवठा केला जातो. यापैकी एमआयडीसी पाच व एमजेपी ११ एमएलडी अशा स्वरूपात पाणीपुरवठा करते.

देहरंग धरणातील पाणीसाठा कोणत्याही क्षणी संपुष्टात येऊ शकतो. पाणीपुरवठा अतिशय कमी प्रमाणात होत असल्याने शहरातील नागरिकांना पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. शहरात २९ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. देहरंग धरणाने तळ गाठल्याने पालिकेला इतर प्राधिकरणांच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा लागणार आहे.

## तळोजे फाटा येथे कंटेनरच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कंटेनरच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यु झाल्याची घटना पनवेल जवळील तळोजा फाटा येथे घडली आहे.

मुंबई येथे राहणारे नितीन शहा (वय-५०) हे आपल्या इतर सहा मित्रांसह जुहू येथून लोनावळा येथे जाण्यासाठी सायकलने चालले असताना ते तळोजा फाटा या दिशेने आले असता भरधाव कंटेनरने त्यांच्या सायकलीस धडक देऊन त्यांना सायकलसह फरफटत दुरवर नेल्याने त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. या घटनेनंतर चालक कंटेनरसह पसार झाला आहे. या घटनेची नोंद खारघर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मुरुडमधील खारआंबोली - आगरदांडा रस्त्याचे खड्डे बुजविण्याचे काम सुरु ; नागरिकांना दिलासा

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील खारआंबोली - आगरदांडा रस्त्यामध्ये अनेक वर्षांपासून खड्डे बुजविले नव्हते. या मार्गावरील रस्ता अतिशय खराब झाला होता. आगरदांडा परिसरातील सर्व नागरिकांना आरोग्य सेवा, सरकारी कार्यालये, खरेदी, मुलांच्या शाळा इत्यादी अनेक कारणांसाठी मुरूड शहराकडे सतत यावे लागते त्यातच खड्डेमय रस्त्यांमुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते.



काहींना पाठीच्या मणक्यांचे आजार जडले होते. तसेच अपघाताचाही धोका होता त्यामुळे गेल्या चार पाच दिवसांपूर्वी रस्त्यांची त्वरित दुरुस्ती व डांबरीकरण करण्यासाठी शिवसेनेचे मुरुड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांनी ३ जून रोजी उपोषणाला बसणार असल्याचे निवेदन मुरुडचे तहसीलदार उपविभाग उपअभियंता सार्वजनिक बांधकाम खाते व आमदार महेंद्र दळवी यांना दिले होते. त्यावेळी उपतालुका प्रमुख मनोज कमाने, शिवसेनेच्या मुरुड तालुका महिला संघटिका शुभांगी करडे, सुनील नाक्ती व इतर पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी आम्ही निवेदनाची दाखल घेऊन चार ते पाच दिवसात खड्डे बुजविण्याचे काम सुरु करू असे आश्वासन मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्याचे उप अभियंता एस.गणगणे यांनी सांगितले होते. सदर रस्त्याचे खड्डे बुजविण्याचे काम सुरु झाले असून तूर्तास नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

## माथेरान टीमने घेतले लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशिर्वाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेतून भाजपात प्रवेश करून सेनेला जोरदार धक्का देणाऱ्या माथेरानच्या टीमने आज (दि. ०२ जून) लोकनेते रामशेठ ठाकूर यांची वाढदिवसानिमित्त सदिच्छा भेट व आशिर्वाद घेतले.

माथेरान नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष आकाश चौधरी यांच्यासह राकेश चौधरी, सोनम दाभेकर, प्रतिमा घावरे, रुपाली आखाडे, सुषमा जाधव, प्रियांका कदम, ज्योती सोनावळे, संदीप कदम, चंद्रकांत जाधव या १० नगरसेवकांनी नुकताच शिवसेनेला सोडचिठ्ठी देत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे १४ पैकी १० नगरसेवकांनी केलेल्या या प्रवेशामुळे शिवसेना मोठा झटका बसला आणि त्या अनुषंगाने हा राज्यात चर्चेचा विषय बनला. भाजपात प्रवेश केलेले उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवक आणि भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष मंगेश म्हस्कर, युवा नेते किरण ठाकरे, ज्येष्ठ नेते प्रविण सकपाळ, प्रदिप घावरे, कुलदिप जाधव, किरण चौधरी, राजेश चौधरी, सचिन दाभेकर, लक्ष्मी चौधरी, गिता जाधव, पुनम सकपाळ, भरती चौधरी, शितल चौधरी आदी माथेरानच्या टीमने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या त्याचबरोबरच आजच्या या शुभदिनापासून आम्ही अधिक जोमाने काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख उपस्थित होते.



> माथेरानच्या टीमने आज भेट घेऊन मला शुभेच्छा दिल्या. माथेरानच्या टीमने जास्तीत जास्त विकासगंगा आणावी यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू.
> **- लोकनेते रामशेठ ठाकूर**

> लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भेट घेत असताना त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांच्या आशिर्वादातून आम्हाला विधायक कामे करण्याची ऊर्जा मिळाली आहे. त्यांच्या आशीर्वादाने अधिक जोमाने काम करू.
> **- आकाश चौधरी, उपनगराध्यक्ष**

> लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व आणि कर्तृत्व संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. त्यांच्या कार्याची महती दूरवर आहे. आम्ही भाजपात प्रवेश केल्यानंतर आजच्या शुभदिनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आशिर्वाद घेऊन अधिक जोमाने कामाला आजपासून सुरुवात करीत आहोत
> **- प्रदीप घावरे, ज्येष्ठ नेते**

# माथेरान अनलॉक करा : स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

केवळ पर्यटनावर अवलंबून असलेल्या माथेरान मधील सर्वांचे जनजीवन कोरोना काळात लॉक डाऊन मुळे पूर्णतः कोलमडले असून दैनंदिन व्यवहारात खूपच अडचणींना सामोरे जावे लागत आहे. बहुतांश ४५ ते साठ वयोगटातील नागरिकांनी वॅक्सीन घेतलेले असून अठरा ते चौरेचाळीस वयोगटातील नागरिकांना हे वॅक्सीन घ्यावयाचे आहे. त्याचप्रमाणे इथे कोरोना रुग्णांची संख्या सुध्दा नगण्य प्रमाणात आहे. त्यामुळे शासनाने माथेरान या रायगड जिल्ह्यातील सुंदर पर्यटनस्थळाला अनलॉक करावे अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे.



माथेरान मध्ये कुठल्याही प्रकारची शेती अथवा औद्योगिक क्षेत्र नसल्याने येणाऱ्या पर्यटकांवर सर्वसामान्य नागरिकांपासून ते मोठमोठ्या हॉटेल व्यावसायिक यांचे जीवनमान अन उदरनिर्वाहाचे साधन अवलंबून आहे. मागील वर्षीच्या कोरोना काळात जवळपास आठ महिने लॉक डाऊन करण्यात आले होते. तर आताही याच पार्श्वभूमीवर १४ एप्रिल पासून इथे सुध्दा लॉक डाऊन सुरू झाल्यामुळे अनेकांना नाईलाजाने कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अत्यंत कष्टदायक कामे यामध्ये हातगाडी ओढण्याची तसेच बिगारीची कामे करावी लागत आहेत. दोन्ही लॉक डाऊन काळात अनेक दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून इथे मोठ्या प्रमाणावर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले आहे तर घोड्यांचा चारा सुध्दा मुबलक प्रमाणात माथेरान प्रेमी पर्यटकांनी वाटप केल्यामुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे. परंतु इथले दैनंदिन व्यवहार पाहता आर्थिक परिस्थिती खूपच हलाखीची झाली आहे. त्यामुळे सध्या एमएमआरडीएच्या माध्यमातून जी काही गावात विकास कामे सुरू आहेत त्यासाठी मालवाहतुक करण्यासाठी इथला युवा वर्ग हातगाडीला जुंपला गेला आहे.

पर्यटन सुरू झाल्याशिवाय इथल्या अश्वपालकांसह, हातरीक्षा चालक श्रमिक वर्ग त्याचप्रमाणे लॉज धारकांना सुध्दा या कठीण प्रसंगी खूप त्रास सहन करावा लागत आहे. अनेकांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. लॉक डाऊन मुळे बाजारपेठेत जी काही स्मशानशांतता पसरली आहे.केवळ माथेरान वर अवलंबून असणारा आदिवासी बांधव आपला भाजीपाला तसेच अन्य ऋतु प्रमाणे येणाऱ्या नैसर्गिक पावसाळी जिनसा विकण्यासाठी येऊ शकत नाहीत त्यांनाही हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. त्यासाठी इथल्या एकंदरीत भौगोलिक परिस्थितीचा विचार करता शासनाने माथेरान अनलॉक केल्याशिवाय स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार नाहीत. याकामी लोकप्रतिनिधीनी शासनाकडे याबाबत पाठपुरावा करणे गरजेचे असल्याचे नागरिक बोलत आहेत.

## पनवेल महापालिका क्षेत्रात आज कोविशिल्ड लसीचा पहिला व दुसरा डोस बंद

### कोवॅक्सीन लसीचा दुसरा डोस सुरू राहणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सध्या कोविड-१९ लसीकरण सुरू आहे. मात्र लसींचा तुटवडा असल्याकारणाने आज (गुरुवार दि.३ जून) कोविशिल्ड चा पहिला व दुसरा डोसचे लसीकरण बंद असणार आहे.

सध्या कोव्हॅक्सीन आणि कोविशिल्ड अशा दोन प्रकारच्या लसींचा दुसरा डोस ४५ वर्षावरील नागरिकांना देण्यात येत आहे. यातील कोविशिल्ड लसीचा पर्याप्त साठा नसल्या कारणाने ही केंद्रे बंद राहणार आहेत.

कोवॅक्सीनचा दुसरा डोस कळंबोली येथील काळभैरव मंगल कार्यालय येथे सुरु असणार आहे.

तसेच रोटरी जिमखाना, बावन बंगला ,पनवेल येथे कोवॅक्सीनचा दुसऱ्या डोसचे केंद्र सुरु होणार आहे. कोविशल्डलसींचा साठा उपलब्ध झाल्यानंतर पुन्हा लसीकरण कार्यक्रम सुरु करण्यात येईल.